**महाराष्ट्र शासन**
जलसंपदा विभाग,
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ईमेल:- dayanand.munjale@nic.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८७०७८०

---

क्रमांक :- संकीर्ण ११२२/प्र.क्र.१२२/आस्था (अतांत्रिक) दिनांक :- २७/०४/२०२२

प्रति,

सर्व कार्यकारी संचालक,
सव मुख्य अभियंता,
सर्व अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी,
सर्व अधीक्षक अभियंता,
सर्व कार्यकारी अभियंता

विषय :- शासनाकडून मागविलेली माहिती विहित कालमर्यादेत उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ :- जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.सुमात २०१२/प्र.क्र.३०६/२०१२/ आस्था (अतांत्रिक), दिनांक २१ मार्च, २०१३

शासनाच्या इतर विभागाकडून विविध प्रकारची माहिती विहित कालमर्यादेत सादर करण्याबाबत विभागास कळविण्यात येते. त्यानुषंगाने, सदर माहिती विहित कालमर्यादेत सादर करण्याबाबत परिमंडळीय कार्यालयास कळविण्यात येते. तथापि, परिमंडळीय कार्यालयाकडून सदर माहिती विहित कालमर्यादेत शासनास सादर होत नाही. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही मंडळ कार्यालयाकडून सदरची माहिती विहित कालमर्यादेत परिमंडळ कार्यालयास सादर करण्यात येत नसल्याने, सदरची माहिती विभागास विलंबाने प्राप्त होते. परिणामी, माहिती अभ्यावि संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना सामोरे जाणे कठीण जाते.

२. त्यानुषंगाने, आपले लक्ष संदर्भाधीन शासन निर्णयाकडे वेधण्यात येत असून, सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.१२ पुढीलप्रमाणे आहे:-

*१२. परिमंडळीय अधिकाऱ्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत:-*

*शासनाच्या वतीने परिमंडळीय स्तरावरील अधीक्षक अभियंता हे संनियंत्रण व समन्वयन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शासनाने परिमंडळामार्फत मागविलेली विधीमंडळ, न्यायालयीन, लोकआयुक्त, वैधानिक आयोग, रिक्त पदे इत्यादी संदर्भातील माहिती सर्व कार्यकारी संचालक, महासंचालक, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता यांनी संबंधित परिमंडळ कार्यालयास विहित कालमर्यादेत उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. मात्र शासन स्तरावरुन मागविण्यात आलेली माहिती क्षेत्रीय कार्यालयाकडून परिमंडळास विहित कालमर्यादेत उपलब्ध होत नसल्याने विभागाची संकलित माहिती सादर करण्यास विलंब लागतो. शासन स्तरावरुन मागविण्यात आलेली माहिती परिमंडळास उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत*

असल्यास किंवा आपली जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल, असे दिनांक २३ मे २००३ च्या परिपत्रकामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे यापुढे शासनास अपेक्षित माहिती एखादा क्षेत्रीय अधिकारी उपलब्ध करुन देत नसल्याबाबत परिमंडळाने शासनास कळविल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल. सबब, सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी परिमंडळीय कार्यालयांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची दक्षता घ्यावी.

३. तरी शासनाकडून मागविलेली माहिती विहित कालमर्यादेत सादर करण्याची सर्वसंबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

**(अ.वि.देवकाते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

आस्था (अतांत्रिक) संग्रहार्थ.